**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात २ टक्के वाढ
- मुंबईतल्या कबुतरखान्यांसदर्भात उच्च न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेप करायला सर्वोच्च न्यायालयाचा नकार
- लोकसभेत नवीन प्राप्तिकर विधेयक सादर
- निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर इंडिया आघाडीचा मोर्चा
- काँग्रेस शत्रुराष्ट्रांची भाषा बोलत असल्याचा केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा आरोप

**आणि**

- तिसऱ्या श्रावण सोमवार निमित्त राज्यातल्या शिव मंदीरांमध्ये गर्दी

**<><><><>**

राज्य सरकारनं कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात २ टक्के वाढ केली आहे. राज्य सरकारमध्ये कार्यरत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना तसंच निवृत्ती वेतन धारकांना आता ५३ ऐवजी ५५ टक्के महागाई भत्ता मिळेल. १ जानेवारीपासून या महागाई भत्त्याची थकबाकीही ऑगस्टच्या वेतनासोबत दिली जाईल. यासंदर्भातला शासन आदेश सरकारनं आज जारी केला.

**<><><><>**

राज्यातल्या असंघटित कंत्राटी कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा चौकट निश्चित करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारच्या विचाराधीन आहे. सुमारे पाच लाख  कंत्राटी कामगारांसाठी एक कल्याण निधी स्थापन केला जाणार असून कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी या निधीमधून आरोग्य विमा, जीवन विमा, निश्चित उत्पन्न, शैक्षणिक लाभ इत्यादी सहाय्य करता येऊ शकेल. त्यासाठी कंपन्यांवर उपकर लावण्याची शिफारस कामगार विभागानं तयार केलेल्या मसुद्यात करण्यात आली आहे.

**<><><><>**

मुंबईतल्या कबुतरखान्यात कबुतरांना खायला घालू नये या मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेप करायला नकार देत कबुतरांना खायला घालणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने बृहन्मुंबई महानगरपालिकेला आज दिले. याचिकाकर्त्यांनी आदेशात बदल करण्याची विनंती उच्च न्यायालयात करावी असंही न्यायमूर्ती जे के माहेश्वरी आणि विजय बिष्णोई यांच्या पीठाने म्हटलं आहे.

कबुतरखाना पाडू नये मात्र कबुतरांना खायला घालू नये असं उच्च न्यायालयाने महानगरपालिकेला सांगितलं होतं. त्यानंतरही काही लोकांकडून कबुतराला खायला घालणं सुरूच असल्यानं अशा लोकांवर  फौजदारी गुन्हे दाखल करावेत असे निर्देश न्यायालयानं ३० जुलै रोजी दिले.

<><><><>

बौद्धिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांसाठी दिशा अभियान राबवण्यात आलं असून, एक नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम राज्यातल्या ४५३ विशेष शाळांमध्ये लागू झाला असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. बौद्धिकरीत्या अक्षम असलेल्या विद्यार्थ्यांसाठी अश्या प्रकारचा अभ्यासक्रम राबवणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य आहे. राज्यातल्या सर्व शासकीय अनुदानित आणि विनाअनुदानित विशेष शाळांमध्ये हा अभ्यासक्रम राबविण्यात येतो. दिशा अभियान ४५३ शाळांमध्ये राबवण्यात येत असून यामध्ये सुमारे अडीच हजार शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आलं आहे. या अभियानाचा थेट लाभ १८ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना मिळाला आहे.

<><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आज राज्यात ठिकठिकाणी आंदोलन करण्यात आलं. सोलापूरमध्ये  भ्रष्टाचारी मंत्र्याच्या विरोधात जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर आंदोलन करण्यात आलं वाशिम शहरातील पुसद नाका येथे जन आक्रोश आंदोलन करण्यात आले यावेळी काही काळ त्या ठिकाणी चक्काजाम आंदोलने करण्यात आल्याने वाहतूक विस्कळीत झाली होती.

<><><><>

माहिती आणि प्रसारण मंत्रालय आणि राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणारा देशभक्तीपर चित्रपटांचा महोत्सव आजपासून नवी दिल्ली इथं सुरू झाला. येत्या १३ तारखेपर्यंत हा महोत्सव चालणार असून या महोत्सवाचं उद्दिष्ट राष्ट्रभक्तीला सन्मान देणं हा आहे.

हरघर तिरंगा अभियानाअंतर्गत हिंगोली नगर परिषदेच्या वतीनं आज तिरंगा रॅली काढण्यात आली. उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्याम माळवटकर यांनी हिरवा झेंडा दाखवून या रॅलीला सुरुवात केली.

**<><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज लोकसभेत नवीन प्राप्तिकर विधेयक मांडलं. याआधीच्या प्राप्तिकर विधेयकात काही त्रुटी आढळल्यानं सरकारनं ते गेल्या आठवड्यात मागे घेतलं होतं. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात आज सकाळी विरोधी पक्षांनी विविध कारणांवरून गदारोळ केल्यामुळे आज दोन्ही सभागृहांचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत स्थगित करण्यात आलं. सकाळी अकरा वाजता राज्यसभेचं कामकाज सुरु होताच उपाध्यक्ष हरिवंश यांनी शून्य प्रहर पुकारण्याचा प्रयत्न केला, परंतु विरोधकांनी बिहार मतदारयाद्या पुनरिक्षण यासह इतर मुद्दे मांडण्यास सुरुवात केली. विविध पक्षांकडून पाच मुद्द्यांवर २९ स्थगिती प्रस्ताव प्राप्त झाल्याची माहिती उपाध्यक्षांनी दिली. यापैकी १८ प्रस्ताव न्यायालयात दाखल असलेल्या प्रकरणांशी संबंधित असल्यानं त्यावर चर्चा होऊ शकत नसल्याचं ते म्हणाले. यामुळे विरोधकांनी गदारोळ करण्यास सुरुवात केली. अधिवेशनाचा कालावधी वाया जात असल्याचं सांगत उपाध्यक्षांनी विरोधकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला, पण गदारोळ कायम राहिल्यानं दुपारी दोन वाजेपर्यंत कामकाज स्थगित करण्यात आलं .

लोकसभेतही असंच चित्र दिसून आलं. विरोधक नियोजित पद्धतीनं गदारोळ करत असल्याबद्दल लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी नापसंती व्यक्त केली. करोडो रुपये वाया जात असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

निवडणूक आयोग पक्षपातीपणे काम करीत असल्याचा आरोप करुन, इंडिया आघाडीच्या खासदारांनी आज निवडणूक आयोगाच्या दिल्लीतल्या कार्यालयावर मोर्चा

काढला. बिहारमधलं मतदारयाद्या पुनरिक्षण रद्द करण्याची मागणी मोर्चेकऱ्यांनी केली. पोलिसांनी मोर्चा अडवला तेव्हा आंदोलनकर्त्या खासदारांनी रस्त्यावरच ठिय्या दिला. लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्यासह अनेक खासदारांना पोलिसांनी ताब्यात घेतलं.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, अखिलेश यादव यांच्यासह अनेक खासदार मोर्चात सहभागी झाले होते.

**<><><><>**

काँग्रेस शत्रुराष्ट्रांची भाषा बोलत असल्याचा आरोप केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी केला आहे. नवी दिल्ली इथं ते पत्रकारपरिषदेत बोलत होते. हातून सत्ता गेल्यामुळे अराजक माजवण्याचा काँग्रेसचा प्रयत्न असल्याचं ते म्हणाले. घुसखोरांना मतदार घोषित करुन काँग्रेसला सत्ता मिळवायची आहे, असं ते म्हणाले.

निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालयासारख्या संवैधानिक संस्थांची प्रतिमा विरोधक मलीन करत आहेत असा आरोप केंद्राय संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी केला. आंदोलन करणाऱ्या खासदारांपैकी ३० जणांनी भेटावं अशी परवानगी निवडणूक आयोगानं दिली होती, परंतु आयोगाने सर्वच आंदोलनकर्त्या खासदारांची भेट घ्यावी असा त्यांचा हट्ट होता असं रिजिजू म्हणाले.

**<><><><>**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांना कर्नाटकच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी नोटीस बजावली आहे. २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीत, काही मतदारांनी दोनदा मतदान केल्याचा दावा राहुल गांधी यांनी केला होता. हा दावा केलेले पुरावे सादर करण्यासंदर्भात राहुल गांधी यांना, कर्नाटकचे मुख्य निवडणूक अधिकारी व्ही. अंबुकुमार यांनी काल नोटीस जारी केली आहे.

**<><><><>**

नवी दिल्लीत संसद सदस्यांसाठी बांधलेल्या १८४ सदनिकांचं उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज झालं.  बाबा खडक सिंह मार्गावरच्या या संकुलातल्या इमारतींना कृष्णा, गोदावरी, कोसी आणि हुगळी या चार नद्यांची नावं देण्यात आली आहेत. या संकुलामुळे खासदारांचं जीवनमान सुधारेल आणि लोकांसाठी अधिक कार्यक्षम राहता

येईल अशी आशा प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली. २०१४ नंतर ३५० पेक्षा जास्त घरं बांधण्यात आली असून, यामुळे खर्चातही मोठी बचत होणार आहे. हे संकुल 'एक भारत श्रेष्ठ भारत' च्या संकल्पनेचं प्रतीक असल्याचं सांगून, प्रत्येक प्रांताच्या सणांचं आयोजन इथं व्हावं अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी प्रधानमंत्र्यांनी शेंदूर वृक्षाचं रोप लावलं, तसंच या संकुलांचं बांधकाम करणाऱ्या कामगारांशी संवाद साधला. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू, मनोहरलाल खट्टर आदी मान्यवर उपस्थित होते.

<><><><>

BSNL नं आज एरिक्सन, क्वालकॉम, सिस्को आणि नोकिया या कंपन्यांसोबत डिजिटल कौशल्य विकासासाठी सामंजस्य करार केले. कुशल आणि भविष्यातल्या तंत्रज्ञानासाठी तयार असलेले मनुष्यबळ तयार करण्यासाठी हे करार महत्त्वपूर्ण असल्याचं केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे म्हणाले.

<><><><>

तिसऱ्या श्रावणी सोमवार निमित्तानं आज राज्यातल्या शिव मंदीरांमध्ये भाविकांनी मोठी गर्दी केली आहे. मराठवाड्यात वेरुळ इथलं घृष्णेश्वर, परळी इथलं वैद्यनाथ आणि औंढा इथल्या नागनाथ, या ज्योतिर्लिंग स्थळीदेखील नागरिक मोठ्या संख्येनं दाखल होत आहे. स्थानिक प्रशासनांनी भाविकांच्या सोयी सुविधांसाठी अनेक उपाययोजना केल्या आहेत.नाशिक जिल्ह्यातल्या श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर इथं ब्रह्मगिरीची प्रदक्षिणा करण्यासाठी भाविक मोठ्या संख्येनं दाखल झाले आहेत.

<><><><>

आयडीबीआय बँकेतून सरकारी गुंतवणूक काढून घेण्याची प्रक्रीया थांबवावी या आणि इतर मागण्याच्या समर्थनार्थ बँकेच्या अधिकारी आणि कर्मचारी संघटनांनी आज एक दिवसाचा लाक्षणिक संप केला आहे. आयडीबीआय बँकेत भारत सरकार आणि आयुर्विमा महामंडळाचे मिळून ९५ टक्के समभाग आहेत. त्यामुळे सार्वजनिक क्षेत्रातली विकास बँक हा दर्जा पुन्हा द्यावा अशीही त्यांची मागणी आहे. संघटनेच्या वतीनं आज मुंबईत आझाद मैदान इथं निदर्शनं करण्यात आली.

//<><><><>//